Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmail.com FAX:[0231]2690758
Web : sscboardkolhapur.in

# परिपत्रक क्र.कोविम/उमाप (इ.12 वी)/ आवेदनपत्र/जुलै-ऑगस्ट 2023/426 दि. 29/05/2023

विषय :- जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरताना घ्यावयाच्या महत्वाच्या सुचनांबाबत....

संदर्भ :- 1. क्र.रा.मं./परीक्षा-3/2228 दि.25/05/2023 चे पत्र.
2. क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/402 दि.25/05/2023 चे परिपत्रक.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, **जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of credit घेणारे विद्यार्थी) अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे दि.29/05/2023 ते 14/06/2023 या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.** (सदर कालावधीनंतर आवेदनपत्र भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ होणार नाही, याची नोंद घ्यावी)

**+ विद्यार्थ्यांची आवेदनपत्र अपलोड करताना खालीलप्रमाणे महत्वाच्या सूचनांचे पालन करावे.+**

1. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना विद्यार्थी प्रकारानुसार खालीलप्रमाणे आवेदनपत्र क्रमांक देण्यात यावेत.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचा प्रकार | आवेदनपत्र क्रमांक |
|---|---|---|
| 1 | नियमित विद्यार्थी | 0001 ते 5000 |
| 2 | पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी | 5001 ते 6000 |
| 3 | खाजगी विद्यार्थी | 6001 ते 7000 |
| 4 | श्रेणी सुधार विद्यार्थी | 7001 ते 8000 |
| 5 | तुरळक विषय | 8001 ते 9000 |
| 6 | योग्यता प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी | 9001 ते 10000 |

2. ऑनलाईन आवेनदपत्र क्रमांक दिल्यानंतर आवेदनपत्र पत्र क्रमांक Edit करता येत नाही. आवेदनपत्र अपलोड केल्यानंतर Edit करण्याचा प्रयत्न केल्यास एकाच विद्यार्थ्यांची दोन वेळा नोंद होवून परीक्षा शुल्काची रक्कम नियमानुसार कनिष्ठ महाविद्यालयास दोनदा भरावी लागेल. तसेच सदर एक आवेदनपत्र रद्द करण्याकरिता मंडळ नियमानुसार पुन:श्च रुपये 500/- भरावे लागेल. तरी आवेदनपत्र क्रमांक अचूक भरण्यात यावे.
3. आवेदनपत्र अपलोड करताना विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव/आईचे नांव व जन्म तारखेची नोंद व इतर माहिती जनरल रजिस्टर वरील नोंदीप्रमाणेच अचूक भरावी.
4. आवेदनपत्रात विद्यार्थ्यांचा विषय कोड क्रमांक, उत्तराचे माध्यम कोड (Lang of Ans.Code No.) व इतर माहिती भरताना योग्य कोड नंबर अचूक नमूद करण्यात यावा. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांची पूर्वीच्या गुणपत्रिका पाहूनच विषय नमुद करावेत व विद्यार्थ्यास एखाद्या विषयात सूट असल्यास त्या विषयात सूट दर्शवून एकूण सुटलेल्या विषयाची संख्या नमूद करावी.
5. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास मान्यता असलेल्या शाखा/विषय/माध्यमानुसारच विषय घेणे अनिवार्य आहे.
6. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी सर्व विषय घेवून प्रविष्ठ होत असल्यास पर्यावरण शिक्षण (EVS) आरोग्य व शारीरिक शिक्षण (PE) या विषयात प्रविष्ठ दर्शविण्यात यावे व Non Exempted चा कोड देण्यात यावा.
7. खाजगी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे भरतांना ज्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झाले आहेत अशाच विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यात यावेत. तसेच खाजगी पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रात यापूर्वीचा नांव नोंदणी प्रमाणपत्रावरील (Enrollment Certificate) क्रमांकाची अचूक नोंद करावी.
8. दिव्यांग विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रवर्गानुसार मंडळाने निर्धारित केलेला दिव्यांग कोड आवेदनपत्रात अचूक नमूद करावा. पुनर्परिक्षार्थी दिव्यांग सवलतीबाबतचे पत्र प्राप्त झाले आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पुनश्च सादर करण्यात येवू नये. मात्र मंडळाच्या सवलतीच्या पत्राची एक प्रत दि.16/06/2023 रोजी आपल्या निर्धारित वितरण केंद्रावर सादर करावी.
9. आवेदनपत्र अपलोड केलेल्या खाजगी विद्यार्थ्यांची यापूर्वीची नांव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate)/ योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate), पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांच्या (एकापेक्षा जास्त असल्यास सर्व गुणपत्रिका), श्रेणी सुधार (C.I.S.) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, तुरळक विषय (Isolated) विद्यार्थ्यांच्या **गुणपत्रिकांच्या छायांकित सत्य प्रतीवर आवेदनपत्र क्रमांक नोंदवून गुणपत्रिकांचा एकत्र गठ्ठा दि.16/06/2023 रोजी निर्धारित वितरण केंद्रावर प्रिलिस्ट जमा करतेवेळी देण्यात यावेत.**

10. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र अपलोड केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहीत शुल्क अचूक भरणा करावे. विहीत शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

## श्रेणी / गुणसुधार योजनेतंर्गत (Class Improvement Scheme) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत विशेष सूचना

1. जुलै-ऑगस्ट 2022 व फेब्रुवारी-मार्च 2023 मध्ये प्रथम नोंदणी करुन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेतंर्गत परीक्षेस पुन:श्च प्रविष्ठ होण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. जुलै-ऑगस्ट 2022 साठी प्रथमच प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांना श्रेणी / गुणसुधार (Class Improvement Scheme) साठी जुलै-ऑगस्ट 2023 **ही परीक्षा अंतिम संधी असेल. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी यांना श्रेणी सुधार योजनेतंर्गत परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी**.
2. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची श्रेणीसुधार योजनेच्या नियमानुसार प्रथम प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिकेतीलच सर्व विषय व माध्यम विद्यार्थ्यास घेणे आवश्यक असल्याने त्याची खात्री करुनच आवेदनपत्र अपलोड करावे. अशा विद्यार्थ्याचा CIS Code 04 आवश्यक असून जर चुकून नियमित विद्यार्थ्याचा कोड नमूद केल्यास तो श्रेणीसुधार ऐवजी नियमित विद्यार्थी होईल असे प्रकरण निदर्शनास आल्यास मंडळास चुकीची माहिती सादर केल्याबाबत नियमानुसार कनिष्ठ महाविद्यालयाविरुद्ध गंभीर कारवाई करण्यात येईल.

## तुरळक विषय घेऊन (Isolated) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत विशेष सूचना

1. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर कोणतीही समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस किंवा इतर कोणत्याही समकक्ष परीक्षेस जो/ जे विषय घेतला नसेल /घेतले नसतील तो/ ते विषय घेऊन परीक्षेस आयसोलेटेड योजनेअंतर्गत प्रविष्ठ होता येईल.
2. अशा उमेदवारास त्याने परीक्षेत घेतलेल्या स्वतंत्र (Isolated) विषयात / विषयांमध्ये त्याने मिळविलेल्या गुणांचे गुणपत्रक देण्यात येईल. अशा गुणपत्रकात फक्त विषयातील संपादित गुण नमुद केले असतील. परंतु उत्तीर्ण/ अनुत्तीर्ण असा निकाल किंवा गुणांची टक्केवारी दर्शविण्यात येणार नाही.
3. सदर उमेदवार कोणतेही प्रमाणपत्र किंवा पारितोषिक, क्रीडा सवलतीचे गुण, किंवा शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असणार नाही.
4. **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस किंवा इतर कोणत्याही समकक्ष परीक्षेस यापूर्वी प्रविष्ठ विषयास आयसोलेटेड योजनेअंतर्गत प्रविष्ठ होता येणार नाही याची नोंद घ्यावी**.

**(दत्तात्रय शंकर पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**वितरण केंद्र प्रतिनिधींना सुचना**:-

सर्व जिल्हा वितरण केंद्र प्रतिनिधींना कळविण्यात येते की, वरील सूचनेनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2023 परीक्षेकरीता नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट, चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तूरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापुर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत, प्रिलिस्ट दुरुस्ती पाकिटे संबंधित क.महाविद्यालयाकडून जमा करुन घ्यावेत आणि कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय गठ्ठे करुन घेवून मंडळ कार्यालयात **सोमवार दि.19/06/2023** रोजी संबंधित जिल्हा लिपिकांना देण्यात यावीत. वितरण केंद्रावर स्विकारण्यात आलेले सर्व साहित्य मंडळात दिले आहे याची खात्री करावी. **परीक्षा प्राधान्य असल्यामुळे दिलेल्या निर्धारित मुदतीतच साहित्य जमा करण्यात यावे.**

**प्रत महितीस्तव** -

1. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा/ सांगली/ कोल्हापूर